Exh.No. 57

# नेवासा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब, ज्यु.डि.

रे.मु.नं. यांचे कोर्टात

६४१/२०१८

**वादी**

श्रीमती लक्ष्मीबाई अंबादास वाल्हेकर

**प्रतिवादी**

प्रयागाबाई अंबादास वाल्हेकर, वगैरे

**याकामी वादी तर्फे प्र.वादीच्या नि.54 च्या अर्जावर म्हणणे असे ते खालीलप्रमाणे -**

1. प्र.वादींचा नि.54 अर्ज कायदेशिर नाही, मुदतीत नाही, तो प्रथमदर्शनी रदद होण्यास पात्र आहे.

Order
Read & Recorded.
PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2025.12.08 17:50:21 +0530
Jt.CJJD

2. प्र.वादीचा नि.54 चा अर्ज खोटा, बनावट व कपोलकल्पीत असुन प्रस्तुतचे वादीस मान्य नाही, कबुल नाही. सदरचा अर्ज हा मे.कोर्टाचे कामकाज जाणीवपुर्वक लांबवीण्याच्या हेतुने प्र.वादीने दिलेला आहे.

3. प्रस्तुतच्या दाव्यातील वादीने दावा दि.16.08.2018 रोजी दाखल केलेला असुन प्रतिवादी नं.1 ते 5 यांना दाव्याची समन्स बजावणी ही दि.16/03/2019 रोजी तर प्रतिवादी नं.7 ते 9 यांना दि.22/03/2019 रोजी तर प्रतिवादी नं.12 यांना दि.18/09/2019 रोजी झालेली होती व आहे.

4. त्यानंतर प्र.वादी नं.1 ते 10 यांनी नि.16 ला दि.03.06.2019 रोजी त्यांची कैफियत दाखल केलेली होती व आहे. तर नि.42 व नि.43 वर प्रतिवादी नं.11 व 12 यांनी सदर प्रतिवादी नं.1 ते 10 ची कैफियत ॲडॉप्ट करत असलेबाबत पुरसिस दिलेली होती व आहे. प्र.वादी नं.11 व 12 यांनी स्वतंत्र पुरसिस दाखल केलेली नव्हती अगर ते प्रतिदावा दाखल करणार असलेबाबत काहीएक ऊहापोह केलेला नव्हता व नाही.

5. त्यानंतर प्र.वादी यांनी या वादीस मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या उद्देशाने नि.18 ला कुठलेही कारण नसतांना सि.पि.सि.ऑर्डर 7 रुल 11 प्रमाणे अर्ज दिला, त्यावर नि.32 वर वादीने त्याचे रितसर म्हणणे दाखल केले व त्यानंतर केवळ सदर दाव्याचे कामकाज लांबवीण्याच्या इराद्याने व वादींना त्यांचा दावा मिळकतीतील हिस्सा मिळू नये व सदर मिळकतीत प्रतिवादी यांना उत्पन्न उपभोग घेता यावे या उद्देशाने अनेक दिवस सदरचा अर्ज चालविला नाही. त्यानंतर मे.कोर्टाने दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून सदरचा प्रतिवादींचा नि.18 अर्ज नामंजुर केला.

6. त्यानंतर नि.43 ला मे.कोर्टाने दि.14.06.2024 रोजी मुद्दे काढल्यानंतर वादीने त्याचे नि.49 ला सरतपासणीचे शपथपत्र दि.24.10.2024 रोजी दाखल केले. परंतु, प्र.वादी यांनी हेतुपुरस्कररित्या वर नमुद केल्याप्रमाणे वादी यांना त्यांचा दावा मिळकतीतील हिस्सा लवकर मिळू नये व प्रतिवादींना त्या मिळकतींचा उत्पन्न उपभोग घेता यावा या उद्देशाने वादीचा उलटतपास घेतला नाही, त्यावर मे.कोर्टाने या प्रतिवादींविरुध्द नो-क्रॉसचा हुकूम केला. त्यानंतर सुमारे दोन महिन्यांनी प्रतिवादी यांनी नि.50 ला सदरचा हुकूम सेट-असाईड करुन मागितला, त्यावर मे.कोर्टाने 300/- रु. दंड करुन सदरचा अर्ज दि.05.04.2025 रोजी मंजुर केला. त्यानंतर ही प्रतिवादी यांनी नि.52 व नि.53 ला पुन्हा त्याच स्वरुपाचे अर्ज देवून हेतुपुरस्कररित्या वादीचा ऊलटतपास घेतला नाही. त्यामुळे मे.कोर्टाने त्यांना अनुक्रमे 1000/- व 1200/- रुपयांचा दंड केला.

7. त्यानंतर पुन्हा काहीतरी कारण दाखवायचे म्हणून तसेच प्रस्तुतचे दाव्याचे कामकाज लांबवीण्याच्या इरादयाने व वादींना त्यांचा दावा मिळकतीतील हिस्सा लवकर मिळू नये व दरम्यान प्रतिवादी यांनाच सदर मिळकती मध्ये उत्पन्न घेवून उपभोग घेता यावा, या गैर उद्देशाने कॉऊंटर क्लेम दाखल करण्याचा खटाटोप प्रतिवादी नं.11 व 12 हे करत आहेत. सर्व प्रतिवादी हे एकमिलाफी असुन ते ऐनकेन मार्गे दाव्याचे कामकाज लांबवीत आहेत. वादी यांनी स्वत: या प्रतिवादी

यांचा दावा मिळकतीत हिस्सा असल्याचे मान्य व कबुल केलेले असुन त्यांना या दाव्यात स्वत:हून पक्षकार केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना स्वत: स्वतंत्र कॉऊंटर क्लेम दाखल करण्याचे काहीएक कारण अगर आवश्यकता नव्हती व नाही, केवळ या वादींना मानसिक व आर्थिक त्रास देण्यासाठी व दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी प्रस्तुतचा कॉऊंटर क्लेम दाखल करण्यात आलेला आहे.

8. त्यामुळे अश्या परिस्थितीत प्रतिवादी प्रयागाबाई अंबादास वाल्हेकर व इतर यांनी केवळ आणि केवळ या वादींना त्यांचा दावा मिळकतीतील हिस्सा लवकर मिळू नये व दावा वर्षानुवर्षे चालत रहावा, जेणेकरुन त्यांना वादींच्या हिश्याच्या मिळकतींचा देखील उपभोग घेता यावा, या उद्देशाने प्रस्तुतचा कॉऊंटर क्लेम विनाकारण सुमारे सात वर्षांच्या कालावधीनंतर जाणीवपुर्वक दाखल करुन या वादींना मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या प्रयत्न करत असल्याने प्रस्तुतचा नि.54 चा रद्द करण्यात येवून वादीस विनाकारण खर्चात पाडले म्हणून प्र.वादी कडून रक्कम रुपये 5000/- कॉस्ट वादींना देण्याचा हुकूम व्हावा, ही विनंती

येणेप्रमाणे वादीतर्फे नि.54 वरील अर्जावर म्हणणे असे.

नेवासा

दिनांक: 08/12/2025

वादी तर्फे ॲड